# - जीवनातील देवाचे स्थान -

## जीवनातील दैवाचे स्थान

नशीब, दैव, नियती हे अत्यन्त साधे वाटणारे शब्द, पण जीवनात व जगात ते केवढा बदल घडवून आणतात ! प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत हे शब्द नसते तर त्याचे आयुष्य किती सुखी झाले असते ! व्यक्तीने स्वकर्तृत्वावर मनांत येईल ती गोष्ट आत्मसात केली असती. जीवनातील आनंद मनसोक्त लुटला असता. पण असे होत नाही. मनांत असूनही, सर्व गोष्टींची अनुकूलता असूनही, प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही हवी असलेली गोष्ट मनुष्य मिळवूं शकत नाही. मग तो मनुष्य लक्षाधीश असो, कोट्याधीश असो वा सत्ताधीश असो. दैवासमोर त्यालाही मान तुकवावीच लागते. त्यामुळे या जगांत दैवाधीन नाही असे कांहीच नाही. प्रत्येक मनुष्य आयुष्यांत जे कांही सुख वा दु:ख भोगतो ते दैवाच्या अनुकूल अथवा प्रतिकूलतेमुळेच होय. म्हटलेच आहे कीं -

> येन यत्रैव भोक्तव्यं सुखं वा दु:खमेव वा ।
> स तत्र बद्ध्वा रज्ज्वेव बलाद्दैवेन नीयते ।।

हा नशिबाचा खेळ कोणालाही चुकलेला नाही. देवाधिदेवानांसुध्दां या भाग्यचक्रातून फिरावे लागते, मग मानवाची तर काय कथा ? म्हणून सुभाषितकार म्हणतात -

> न केवलं मनुष्येषु दैवं देवेष्वपि प्रभु ।
> सति मित्रे धनाध्यक्षे चर्मप्रावरणो हर: ।।

या जगांमध्ये ज्या ज्या व्यक्ती "महान" म्हणून गणल्या गेल्या, त्या सर्वांनी अनंत कष्टांना तोंड दिले आहे, भयंकर दु:खे सोसली आहेत. राम, कृष्ण, पांडव, नलदमयंती, संत ज्ञानेश्वर अशी किती म्हणून नांवें सांगावीत ! पंचकन्या, ज्यांचे स्मरण रोज पहाटे उठल्यावर आपण करावे म्हणून म्हणतो, त्या अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी या सर्व

पतिव्रता स्त्रिया, यांच्या पातिव्रत्यावरच केवढी भयंकर संकटे आली ? सर्वसामान्यांच्या आयुष्यांत येणार नाहीत अशा भयंकर प्रसंगाना त्यांना तोंड द्यावे लागले, अनंत दु:खे त्यांना भोगावी लागली. आणि ती सुध्दां त्यांची कोणत्याही प्रकारची चूक नसतांना. याचे कारण काय ? तर नशीब किंवा दैव हेच याचे उत्तर होय. म्हणूनच कालिदास म्हणतो कीं -

अपावर्तत दूरकृष्टा नीत्येव लक्ष्मी: प्रतिकूलदैवात् । रघु. ६/५८

म्हणजे "पराक्रमाचे जोरावर खेचून आणलेली संपत्ति ज्याप्रमाणे दैव प्रतिकूल असेल तर दूर जाते."

याचा अर्थच असा कीं, अचिंतनीय दैव हे जगांत सर्वात श्रेष्ठ आहे. अन्यथा अन्यायाने, अप्रामाणिकपणाने वागणाऱ्या व्यक्तीं समाजात सुखाच्या शिखरावर लोळतांना दिसल्या नसत्या व प्रामाणिकपणाने जीवन जगणाऱ्या व्यक्ती दु:खात पिचतांना दिसल्या नसत्या.

म्हणजे दैवाच्या अनुकूल अथवा प्रतिकूलतेवरच प्रत्येक व्यक्तीचे यशापयश अवलंबून असते. म्हणून पंचतंत्र सांगते -

" दैवाऽनुकूलतया सर्वं कल्याणं सम्पद्यते "

"दैव अनुकूल असेल तर सर्व कल्याणकारक होते." किंवा

दैववशात् सम्पद्यते नृणां शुभाऽशुभम् ।

"दैववशात् माणसाला शुभाऽशुभाची प्राप्ती होत असते."

तेव्हा ज्या दैवाचा महिमा प्रत्यक्ष देवाधिदेवांनी सुध्दां मानलेला आहे, त्या दैवाचा महिमा कालिदास कसा बरे नाकारेल ? त्याच्या ग्रंथातील सर्व महत्त्वाची पात्रे या दैवाच्या कचाट्यांतून तावून सुलाखून बाहेर पडलेली आहेत. मग ती शकुन्तला असो वा सीता, उर्वशी असो वा मालविका वा परिव्राजिका, दुष्यन्त असो, पुरुरवा असो, अग्निमित्र

असो, राम असो वा अज, दैवाने या सर्वांना आपले सामर्थ्य पटवून दिले आहे. दैवाचे हे सर्वश्रेष्ठत्त्व आणि मानवाचे परावलंबित्व, असहायत्व हे त्या त्या ठिकाणी त्यांनी स्वमुखाने कबूल केले आहे. म्हणूनच या दैवाच्या तडाख्यात सापडलेला राजा पुरूरवा म्हणतो -

सर्वथा नास्ति विधेरलङ्घनीय नाम । येन
तादृशस्यानुरागस्यायमेकपदे अन्यादृशः एव परिणामः संवृत्तः ।

[विक्रमो. ४]

"दैवाधीन नाही असं कांहीही नाही, ज्यामुळे अशा प्रकारच्या दृढ प्रेमाचा विपरीत परिणाम झाला."

उर्वशी आणि राजा पुरूरवा यांच्यामध्ये परस्पर गाढ प्रेम असूनही एका क्षुल्लक कारणासाठी दोघांना विरह यातना सोसाव्या लागल्या. एवढेच नव्हे तर उर्वशीचे एका वेलीत रूपांतर झाले व तिच्या वियोगाने राजा वेडापिसा होऊन इतस्ततः भटकू लागला. याचा अर्थच असा कीं, हे दैव माणसाला स्वस्थ बसून देत नाही. सर्व गोष्टी मनासारख्या झाल्या म्हणून मनुष्य समाधानाने निःश्वास टाकण्याचाच अवकाश की, ते त्याच्या-समोर एखादा प्रश्न घेऊन उभे राहते. म्हणून राजा म्हणतो की,

"अहो, सुखप्रत्यर्थिता दैवस्य"

"दैव हे माणसांच्या सुखांत व्यत्यय आणते." म्हणूनच या दैवाचे महत्त्व ओळखलेल्या राजाने या दैवाबद्दल अनेक उद्‌गार काढलेले आहेत. नशिबाच्या अनुकूल प्रतिकूलतेवर सुखदुःखाचे चक्र फिरत असते हे सांगतांना तो म्हणतो कीं,

" परावृत्तभागधेयानां दुःखं दुःखानुबन्धि । राजा पुरूरवा

[विक्रमो - अंक ४]

- "ज्याचं भाग्य फिरलं त्याचं दुःख दुःखपरम्परा घेऊन येतं."

म्हणजेच या जगामध्ये फक्त सुखच कोणाच्याही वाटणीला कधीही येत नाही. या उनसावलीच्या खेळाप्रमाणे सुखदुःखाचा खेळही सतत प्रत्येकाच्या जीवनांत

चाललेला असतो. आणि तो प्रत्येकाच्या भाग्यचक्रावर अवलंबून असतो. हीच गोष्ट कालिदास पुढील श्लोकाद्वारे पुनरुक्त करतो,

कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ।
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।। मेघ. उत्तर ४६

– " शेवटपर्यन्त सुख किंवा दुःख कोणाला लाभले आहे. कोणतीही दशा चाकाच्या धावेच्या क्रमाप्रमाणे खाली आणि वर जात असते." हा उत्कर्ष-अपकर्षाचा काळ फक्त मानवी जीवनांतच नाही तर निसर्गात सुद्धां दिसून येतो असे कालिदासाने दाखविले आहे. तो म्हणतो –

प्रवृध्दौ हीयते चन्द्रः समुद्रोऽपि तथाविधः ।। रघु. १७/७१

– " म्हणजे पूर्णवाढ झाल्यावर चन्द्र क्षीण होऊ लागतो, त्याप्रमाणे समुद्रही." म्हणजेच हा उत्कर्ष – अपकर्षाचा काळ निसर्गातील प्रत्येक वस्तुमात्राच्या आयुष्यांत येत असतो. म्हणूनच पतीच्या निधनाने दुःखी होऊन सती जाण्यास तयार झालेल्या रतीला आकाशवाणी सांगते कीं –

"रविपीतजला तपात्यये पुनरोघेन हि युज्यते नदी । [कुमार. ४/४४]

– "उन्हाळ्यांत आटलेल्या नदीचा पावसाळ्यांत पुनरपि प्रवाहाशी संयोग होतोच." त्याप्रमाणे हे रति, तुझा व तुझ्या पतीचा कालांतराने संयोग होईल." –

याठिकाणी कालिदासाला हेच सांगावयाचे आहे कीं, दुर्दैवाने माणसांवर संकट आले तरी लगेच त्या दुःखाने माणसाने खचून न जातां धीर धरला पाहिजे, कारण दुःखानंतर सुखाची प्राप्तीही माणसाला होते, ही गोष्ट नदीच्या दृष्टान्ताद्वारा कालिदासाने स्पष्ट केली आहे.

कालिदासाचे हे वैशिष्टयच आहे कीं, या विश्वांत घडणाऱ्या घटनांच्याकडे तो त्रयस्थवृत्तीने पाहात नाही तर तो त्याच्याशी तन्मय होतो, समरस होतो. त्या घटनेचा कार्यकारण सम्बन्ध तो शोधतो.

BARR. B... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

त्यावर सखोल विचार तो करतो. आणि ती गोष्ट तत्त्वरूपाने तो मांडतो. निसर्गात घडणाऱ्या या अनेक घटनांचा मानवी जीवनाशी सम्बन्ध जोडून त्यातून त्याने जीवनाचे तत्त्वज्ञानच मांडले आहे.

या दु:खानंतर प्राप्त झालेले सुख हे अधिक आनंददायक असते असे वृक्षाच्या दृष्टान्ताद्वारा कालिदास सांगतो. तो म्हणतो, –

यदेवोपनतं दु:खात् सुखं तद रसवत्तरम् ।
निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्य हि विशेषत: ।। विक्रमो. ३/२१

– दु:खानंतर जे सुख प्राप्त होते ते अधिकच सुख देते. उन्हात खूप तापल्यानंतर वृक्षाची छाया अधिकच सुख देते."

हेच तत्त्व कालिदासाच्या प्रत्येक नायक-नायिकांच्या बाबतीत लागू पडते. म्हणूनच अनंत कष्ट सोसल्यानंतर त्यांचे झालेले पुनर्मीलन हे त्यांना अधिक सुखावह झालेले आहे.

"अभिज्ञानशाकुंतल" नाटकात दुष्यन्त- शकुंतला यांचे पहिले आणि सहजप्राप्त मीलन हे त्यांना शाश्वत आनंद देऊ शकत नाही. दुर्दैवाने दुर्वास मुनींच्या शापाने त्यांच्या सुखात व्यत्यय येतो, आणि दुष्यन्त राजाला शकुंतलेचे विस्मरण होते. दैव हे दुर्वासांच्या रूपाने त्या दोघांच्यासमोर उभे राहते. आणि या राजाच्या विस्मृतीमुळे दोघांचा जो वियोग होतो, तो त्यांना जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवतो. त्यांचे विचार पूर्ण परिपक्व करतो. आणि यानंतर जे त्यांचे पुनर्मीलन होते, म्हणजे खूप दु:खानंतर सुखाची प्राप्ती होते ती त्या दोघांनाही शाश्वत सुख देणारी ठरते.

पुरुरवा आणि उर्वशी यांचेही प्रथमदर्शनी एकमेकांवर बसलेले प्रेम फारसा अडथळा न येता सहज फलद्रूप होते. पण ते त्यांचे सुख फार काळ टिकत नाही. तर दैव तेथेही आपला प्रभाव दाखविते. एका विद्याधर

कन्येकडे टक लावून पाहिल्यामुळे राजावर रागावून उर्वशी त्याला सोडून निघून जाते, व चुकून कार्त्तिकेयाच्या वनांत शिरते व तिचे वेलीत रूपांतर होते. तिच्या वियोगाने भ्रमिष्ट झालेला राजा तिचा शोध घेत भटकत असतो. तेव्हां हे विरहाचे चटके सोसल्यानंतर त्यांचे झालेले मीलन हे उपभोगमूलक नाही, त्यागमूलक आहे व हे खूप दु:खानंतर त्यांना प्राप्त झालेले सुख त्यांना पूर्वीपेक्षाही जास्त आनंद मिळवून देणारे आहे.

मालविका आणि अग्निमित्र यांचेही प्रेमसाफल्य सहज होत नाही, तर मालविकेला धारिणी व इरावती राणींकडून खूप मानसिक त्रास सहन करावा लागतो. त्या दोघींही त्यांचे प्रेम सफल होऊ नये यासाठी त्यांच्या प्रेमाच्या मार्गात खूप अडथळे आणतात. पण अखेर प्रेमाचा विजय होतो व अनेक दु:खातून मार्गक्रमण करीत त्यांचे प्रेम सफल होते, जे त्यांना आत्यन्तिक आनंद मिळवून देते. या सर्वच नाटकांवरून कालिदासाला हेच स्पष्ट करावयाचे आहे कीं, खूप दु:खानंतर झालेली सुखाची प्राप्ती ही माणसाला अधिकच सुखकारक होते.

पण माणसाला हे खूप दु:ख कारण नसतानांही सोसावे कां लागते ? याला कारण दैव होय. असेच उत्तर कालिदासाच्या सर्व नाटकांतून आपल्याला मिळते.

आपल्या "कालिदास" या ग्रंथात कालिदास दैववादी कसा होता हे सिध्द करतांना डॉ. वि. वा. मिराशी म्हणतात" जे कांही घडले ते तिच्या प्रतिकूल दैवामुळे घडले असेच नाटकांत अनेक ठिकाणी सूचित केले आहे." कण्व मुनींना तिच्या प्रतिकूल दैवाचे शमन करण्याचा प्रयत्न करावा लागतो" हा उल्लेख या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तसेच, या घटनांतील दैवयोगाचे उल्लेख सानुमतीच्या व विदूषकाच्या तोंडीही मुद्दाम घातलेले दिसतात. तेव्हा शकुंतलेला संकटे सहन करावी लागतात ती अपराधाबद्दल शासन म्हणून नव्हे तर दैवाचा परिणाम म्हणून अशी नाटककाराची दृष्टी होती,

असे म्हणणेच अधिक सयुक्तिक दिसते. [कालिदासाचे विचार – प्रकरण ८]
"अभिज्ञान शाकुंतल" नाटकाच्या संदर्भात कालिदासाने मांडलेले हे विचार त्याची दैववादी वृत्ती सूचित करण्यास पुरेसे आहेत.

तसेच महाभारतातील शाकुन्तलेपेक्षा शाकुन्तलामधील शकुन्तला सर्वस्वी भिन्न आहे. संकटाला धीटपणे तोंड देणे कालिदासाच्या शकुन्तलेला जमेलसे वाटत नाही. ती अधिक परावलम्बी व शेवटी दैववादी बनली आहे" असेही डॉ. मिराशी शकुंतलेच्या संदर्भात म्हणतात.

"अभिज्ञान शाकुंतलात" अशा प्रकारे दैवाबद्दलचे अनेक विचार शकुंतलेच्या मुखातून कालिदासाने व्यक्त केले आहेत. आपल्या नशिबामध्ये एखादी गोष्ट जर घडावयाची असेल तर ती आपल्या स्वप्नांतही येणार नाही अशा पध्दतीने घडून येते. इतकी दैवाची शक्ति अचाट आहे हे सांगतांना कालिदास म्हणतो –

"अवश्यंभाव्यचिन्तनीय: समागमो भवतीति" [अभि. शां. ६]

– "समागम व्हावा अशी जर भवितव्यता असली तर आपल्याला कल्पनाही येणार नाही अशा रीतीने तो होतो." म्हणजे नशिबात असेल ती गोष्ट होणारच हा विचार कालिदासाने बाठिकाणी व्यक्त केला आहे. राजाला इतक्या अद्भूत रीतीने ती अंगठी प्राप्त झाली की, शकुंतलेशी पुनर्मीलन होण्याचेच हे सुचिन्ह होते. तेव्हा या संदर्भात विदूषकाने काढलेले हे उद्गार दैवाचे सामर्थ्यच व्यक्त करतात.

तसेच शकुंतला व दुष्यन्त यांचे स्वर्गात जे पुनर्मीलन होते याचे कारण "दैव" असेच त्या दोघांनीही मानले आहे. तसे उद्गारही वेळोवेळी त्यांनी काढले आहेत. उदा. शकुंन्तला – हृदय ! समाश्वसिहि ! समाश्वसिहि ! परित्यक्त – मत्सरेणानुकम्पितास्मि दैवेन ! आर्यपुत्र: एवत्वेष ! म्हणजे, हृदया, धीर धर, दैव आपला मत्सर विसरलं, आणि

त्यानं माझ्यावर दया केली आहे, हे खात्रीने आर्यपुत्रच आहेत. तसेच पुढील श्लोक -

स्मृतिभिन्नमोहतमसो दिष्टया प्रमुखे स्थितासि मे सुमुखि ।
उपरागान्ते शशिन: समुपगता रोहिणी योगम् ।। अभि. शां. ७/२२

- "माझं भाग्य असं थोर आहे कीं, स्मृति जागृत झाल्यामुळे ज्याचा मोहरूपी अंधकार लयाला गेला आहे अशा माझ्यासमोर, हे सुवदने, तूं उभी आहेस, ग्रहण सुटल्यानंतर चंद्राबरोबर रोहिणीचं मीलन झालं आहे." पुढे बालक आईला विचारते कीं, मात:, क एष ? आई, हे कोण ? यावर शकुन्तला उत्तरते, वत्स, ते भागधेयानि पृच्छ. बाळा, तुझ्या दैवालाच विचार.

या सर्व उद्गारावरून कालिदासाला हेच स्पष्ट करावयाचे आहे कीं, या जगात घडणारी प्रत्येक घटना दैवाधीन आहे, त्यामध्ये मनुष्यच काय प्रत्यक्ष परमेश्वरसुध्दां बदल करूं शकत नाही. तसेच हे भाग्य माणसाची परीक्षाही पाहते. ते आयुष्यांत प्रत्येक माणसाला संधी देऊन पाहते, पण ती संधी त्याने डावलली तर पुन्हा तशी संधी त्याला प्राप्त होणे अवघड. हीच गोष्ट दुष्यन्त राजा पुढील श्लोकार्धात सांगतो. इंद्राचे कार्य सिध्दीला नेऊन परत फिरलेला राजा, वाटेत उजवा बाहू स्फुरण पावू लागल्यामुळे साशंक होतो. कारण पुरूषांचा उजवा बाहु स्फुरणे शुभशकून समजतात. व त्याच्या दृष्टीने शुभ गोष्ट म्हणजे शकुंतलेची प्राप्ती होणे. पण ती संधी त्याला दैवाने एकदा मिळालेली असतांना त्याने ती डावलली. तेव्हां आता ती संधी पुन्हा मिळणे त्याला अशक्य वाटते. म्हणून तो म्हणतो -

"पूर्वावधीरितं श्रेयो दु:खं हि परिवर्तते ।। अभि. शां. ७/१३

- "भाग्याची एकदां अवहेलना केली कीं ते क्वचितच परत येत असतं !

...AR ...EKAR LIBRARY
...IVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

ही संधी डावलण्याची कारणे अनेक असू शकतील. कांही पैशांनी उन्मत्त झाल्यामुळे ही संधी डावलतील तर कांही सत्तेने अंध झाल्यामुळे. पण या सर्वांच्या मनावर त्यावेळी मोहाचं दडपण असतं असे कालिदास म्हणतो.

प्रबलतमसामेवंप्रायाः शुभेषु हि वृत्तयः । अभि. शां. ७/२४

. "ज्यांच्या मनावर मोहाचं दडपण असतं अशा लोकांची भाग्याच्या बाबतीत अशीच वृत्ती असते." अशा व्यक्ती आलेली संधी घालवितात व नंतर दुःख करीत बसतात. ज्याप्रमाणे दुष्यन्त व पुरूरवा राजा.

तेव्हा थोडक्यांत हे भाग्य माणसाच्या जीवनांत चढउतार निर्माण करते, सुख-दुःख निर्माण करते, माणसाची वेळोवेळी परीक्षा पाहते. म्हणजेच या दैवाच्या हातातील मनुष्य हा एक बाहुले आहे. ते जसे माणसाला नाचवील त्याप्रमाणे त्याला नाचावे लागते, असेच कालिदासाला या सर्व दैवविषयक विचारावरून म्हणावयाचे आहे. म्हणूनच त्याने सर्वत्र दैवाचे श्रेष्ठत्व प्रतिपादिले आहे. व त्यासमोर मानवाचे न्यूनत्व व्यक्त केले आहे. म्हणून पुढे कालिदास म्हणतो की,"भवितव्यतानुविधायीनी-न्द्रियापि" - [विक्रमो. अंक १] -"इंद्रिये भवितव्याला अनुसरून वागतात". यामुळेच उर्वशीच्या तोंडातून भरतमुनींच्या नाटकाचा प्रयोग करीत असतां "पुरूषोत्तमा" ऐवजी "पुरूरवा" हा शब्द बाहेर पडला. भवितव्यतेचे हे सामर्थ्य ओळखूनच कालिदास म्हणतो की -

"भवितव्यता खलु बलवती" [अभि. शां. ६] विदूषक

- "खरं म्हणजे भवितव्यताच खरोखर बलवान असते." हे विदूषकाने काढलेले उद्गार किती सार्थ आहेत बरे ! कोणाच्या नशिबात पुढे काय आहे हे कोणीच सांगू शकत नाही. आणि दैव हे कोणाची दयामायाही करीत नाही. कोणीही व्यक्ती कितीही श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुष वा बालक, पंगु असो वा धडधाकट. मनुष्य असो वा पशु त्याच्या नशिबातील

भोग हे त्यालाच भोगावे लागतात. त्याच्या नशिबाच्या आड कोणीही येऊं शकत नाही. या दैवामुळेच मालविका ही राजकन्या असूनही वर्षभर तिला दासी म्हणून राहावे लागले, सीतेला कांहीही चूक नसतांना जन्माचा वनवास पत्करावा लागला, आणि शकुन्तलेसारखी अल्लड निसर्गकन्या कीं जिला दु:खाची झळ अजिबात लागली नव्हती तिला भयंकर अपमान आणि दीर्घकाळ पतिविरह सहन करावा लागला. या दुर्दैवामुळेच प्राणप्रिय अशी पत्नी इंदुमती अकस्मात अज राजाला सोडून गेली. म्हणजेच या नशिबाच्या कचाटयातून कोणीही सुटत नाही. म्हणून अज राजा म्हणतो की,

"विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ।। रघु. ८/४६

– "परमेश्वराच्या मर्जीप्रमाणे केव्हां केव्हां विष देखील अमृत बनते व अमृत देखील विष बनते." यावरून कालिदासाचा परमेश्वरावरही विश्वास होता हे सिध्द होते. थोडक्यांत कालिदासाच्या मते माणसाच्या हातात तसे पाहतां कांहीच नसते. तो कहं म्हणून एखादी गोष्ट होत नाही व नको म्हणून एखादी गोष्ट राहात नाही. दैवानेच मनांत आपल्यावर त्याला काय करणे अशक्य आहे. म्हणूनच अत्यंत कोमल अशा फुलांच्या मालेने इंदुमतीचे प्राण हरण केले.

कुसुमान्यपि गात्रसङ्गमात् प्रभवन्त्यायुरपोहितुं यदि ।<br>
न भविष्यति हन्त साधनं किमिवान्यत् प्रहरिष्यतो विधेः ।।

[रघु– सर्ग ८/४४]

– "फुले देखील जिथे शरीराशी संयोग झाल्यावर प्राण नेण्यांस समर्थ होतात, तेथे दैवानेच मनांत आपल्यावर त्याला कोणते साधन मिळणार नाही ?" अज राजाने इंदुमतीच्या मृत्यूनंतर काढलेले हे उद्‌गार नशिबाची ठोकर बसलेला प्रत्येक मनुष्य या जगामध्ये काढेल. जीवन जोपर्यंत सुरळीत चाललेले आहे तोपर्यंत मनुष्याला सर्व आपले कर्तृत्व वाटते. पण जेव्हां आयुष्याला कलाटणी देणाऱ्या घटना जीवनांत घडू लागतात तेव्हा "असे कां ?" याचा मनुष्य शोध घेऊं लागतो. व त्याच्या दृष्टीसमोर या सर्वाचे एकच

उत्तर येते ते म्हणजे दैव. हे दैव माणसाला जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवते, जीवनाचा अर्थ समजून सांगते. कालिदासाची बहुतेक सर्वच पात्रे दैवाशी झगडावे लागल्यामुळे जीवनाचा सखोल विचार करणारी बनली आहेत. पण याही परिस्थितीत ती हताश, निराश होत नाहीत, तर कोणत्याही व्यक्तीला दोष देण्यापेक्षा ती स्वत:च्या नशिबाला दूषण देतात. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये कोणाबद्दलही राग नाही. आहे त्या परिस्थितीत ती शांतपणे जीवन व्यतीत करतात. म्हणजेच कालिदासीय सर्व पात्रे तत्त्वज्ञानी आहेत असेच म्हटले पाहिजे. शकुन्तला, सीता, मालविका, अज, परिव्राजिका या सर्वांच्या वाटणीला काय कमी दु:खे आली ? सर्वसामान्यांच्या पेक्षाही भयंकर दु:खाना त्यांना तोंड द्यावे लागले. परिव्राजिकेचे जीवन तर माणसाचे हृदय हेलावून टाकणारे आहे. अकाली वयांत वैधव्य व एकुलता एक मोठा भाऊ सुमति, जो माधवसेनाचा अमात्य आहे, तो ही युध्दांत मारला गेल्यामुळे हीला कोणीही आधार नाही. यामुळे निराधार अशी ती भगवी वस्त्रे परिधान करून अग्निमित्राच्या राज्यात येते. हीला आयुष्यात काय कमी दु:ख भोगावे लागले असेल ? पण ही सर्व दु:खे आपल्या दुर्दैवाचाच एक भाग समजून कालिदासाची पात्रे शांतपणे जीवन व्यतीत करतात. म्हणून ती तत्त्वज्ञानी आहेत. पर्यायाने कालिदासही यामुळे तत्त्वज्ञानी ठरतो. कारण अशी जीवनाचा सम्यक् विचार करणारी पात्रे निर्माण करणारी व्यक्ती स्वत: विचारी, तत्त्वज्ञानी असावी लागते. या पात्रांच्या तोंडी त्यांनी घातलेले उद्गार उदा.

"परिभवास्पदं दशाविपर्यय: [विक्रमो. ४]

– "परिस्थिती बदलली असतां सगळीकडे अपमान होतो," किंवा "महदपि परदु:खं शीतलं सम्यगाहु:" [विक्रमो. ४]

– "असे म्हणतात ते बरोबरच आहे की, दुसऱ्याचे दु:ख कितीही मोठे असले तरी ते कमीच म्हणतात." किंवा

"विपर्ययापामयं प्रभावप्रकाश: [विक्रमो. – ४]

– "हा सर्वप्रकारे माझ्या प्रतिकूल भाग्याचाच खेळ आहे." हे सर्व उद्गार त्याच्या विचारी मनाचेच द्योतक आहेत. आजुबाजुला दिसणाऱ्या घटनांचा उथळपणे विचार न करतां त्यावर चिंतन करणारा कालिदास म्हणूनच "तत्त्वज्ञ" होय.

कालिदासाच्या सखोल विचारसरणीचे सर्वांत परिपूर्ण असे उदा. म्हणजे अज राजाची पत्नी इंदुमती हिच्या अकस्मात मृत्यूनंतर दुःखाने जीविताचाही त्याग करण्याची इच्छा करणाऱ्या अज राजास वसिष्ठ मुनींनी केलेला उपदेश होय. हा उपदेश म्हणजे मानवी जीवनाचे तत्त्वज्ञानच आहे. जे तत्त्वज्ञान प्रत्येक व्यक्तीला एक नां एक दिवस समजून घ्यावेच लागते, आणि त्यामुळेच मानवी जीवन सुसह्य होते. या आपल्या उपदेशांत ते सांगतात की, "विपदुत्पत्तिमतामुपस्थिता ।" म्हणजे "जन्मास येणाऱ्या वस्तुजाताला मृत्यु ठेवलेलाच आहे."

"मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।
क्षणमप्यवतिष्ठते श्वसन्यदि जन्तुर्ननु लाभवानसौ ।। रघु. ८/८७

– "मरणे हा देहधाऱ्यांचा स्वभावच आहे. जीवित ही एक विकृति आहे असे ज्ञाते लोक म्हणतात. प्राणी जरी क्षणभर श्वासोच्छ्वास करीत राहिला तरी देखील तो त्याला मोठा लाभ झाला असे म्हटले पाहिजे." तसेच –

स्वशरीरशरीरिणावपि श्रुतसंयोगविपर्ययौ यदा ।
विरहः किमिवानुतापयेद्वद बाह्यैर्विषयैर्विपश्चितम् ।। रघु. ८/८९

– "जर आपला देह व जीव ह्यांचाही संयोग आणि वियोग ठरलेला आहे, तर मग ज्ञात्याला बाह्य विषयांच्या विरहांनी कां बरे ताप व्हावा ?" वसिष्ठांनी केलेल्या या उपदेशामध्ये संपूर्ण जीवनाचे सार कालिदासाने सांगितले आहे व प्राण्यांच्या या क्षणभंगुर जीवनाचे रहस्य उलगडून दाखविले आहे. या वसिष्ठांच्या उपदेशाच्या पार्श्वभूमीवर अज राजाचे इंदुमतीच्या मृत्यूच्या संदर्भात काढलेले उद्गार सार्थ वाटतात. – तो म्हणतो,

धिगिमां देहभृतामसारताम् ।। [रघु. सर्ग ८/५१]

"प्राण्यांच्या या अस्थिरतेचा धि:क्कार असो." किंवा, राजाची मूर्च्छा वारा घातल्यावर गेली पण इन्दुमती मात्र तशीच निश्चेष्ट राहिली, यावर कालिदास म्हणतो कीं, "

प्रतिकारविधानमायुष: सति शेषे हि फलाय कल्पते ।। रघु. ८/४०

– "कारण आयुष्य शिल्लक असेल तरच औषधोपचारांचा उपयोग व्हावयाचा!" किंवा "भगवति तनुभृतामीदृशी लोक" [मालविका अंक ५]

– " देह धारण करणाऱ्यांची अशीच जीवनयात्रा असते."

या सर्व श्लोकांवरून कालिदासाला हेच स्पष्ट करायचे आहे कीं, जीवन, मृत्यु किंवा आयुष्यांतील कोणतीही घटना ही अटळ आहे. ती दैवाधीन आहे. आणि म्हणूनच शाहण्या माणसांनी त्याबद्दल शोक करूं नये.

जीवनाबद्दल एवढा गहन गंभीर विचार करणारा कालिदास तत्त्वज्ञानी नाही असे कसे बरे म्हणावे ? थोडेसे विषयान्तर करून याठिकाणी सांगावे असे वाटते कीं, कालिदासावर असा आरोप केला जातो कीं, त्याच्या ग्रंथातून मर्यादित जीवनाचे दर्शन घडते. उदा. "कालिदास" या आपल्या ग्रंथात डॉ. वि. वा. मिराशी म्हणतात –

"कालिदासाच्या नाटकांत जीवनाचे मर्यादित दर्शन घडते. त्याची पात्रे समाजाच्या एका विशिष्ट थरांतील, बहुतांशी राजदरबाराशी संलग्न असून स्त्री-पुरुष प्रेमावर केंद्रित अशीच त्याची नाटके आहेत. त्यामुळे मानवाला जीवनांत येणारा विविध अनुभव आणि त्याने त्याची होणारी भावनात्मक किंवा विचारात्मक प्रतिक्रिया याच्या अल्पशा भागाचेच दर्शन कालिदासाच्या नाटकांत होते. बहुतेक पात्रे आदर्श स्वरूपांत रंगविल्यामुळे कांही नाटयगुणांच्या बाबतीत उणीव भासते. कारण त्यामुळे सत्प्रवृत्त व दुर्जन माणसे यांच्यामधील स्वाभाविक संघर्षाचेच दर्शन होणे शक्य होते. पण

एकाच माणसाच्या मनांतील सत्प्रवृत्ती आणि दुष्प्रवृत्ती यांच्यातील संघर्षाला फारसा वाव राहात नाही. म्हणून कालिदासाच्या तिन्ही नाटकांत मानसिक संघर्ष जोरदारपणे चित्रित केलेला कोठे आढळत नाही".

डॉ. मिराशी यांचे हे मत पूर्णपणे सत्य आहे की, मानवी जीवनातील विविधता, त्याची व्यापकता, तसेच मानवाच्या २ मनांतील परस्पर संघर्ष यांचे दर्शन कालिदासाच्या नाटकांत घडत नाही. पण एवढयांवरून कालिदासाच्या व्यापक आणि सखोल ज्ञानाला कोठेही बाध येत नाही. कारण त्याने जी पात्रे आपल्या ग्रंथात रंगविली आहेत, त्यांचे जे विचारदर्शन त्यातून होते. उदा. रघुवंशातील सर्व राजे, परिव्राजिका, कण्वमुनि इ. या सर्वांवरून कालिदासाचे विचारी, संवेदनशील मनच दर्शित होते. त्यांच्या तत्त्वज्ञानी विचारांतून जीवनाची खोली प्रकट होते. आणि कालिदासीय पात्रे ज्या अनंत अडचणींना तोंड देतात, त्यातून त्यांना जीवनाच्या गांभीर्याविषयी, नश्वरतेविषयी जे विचार स्फुरतात त्यावरून कालिदास हा "तत्त्वज्ञ"च होता हे सिध्द होते. तसेच विरहामुळे उत्पन्न झालेल्या दु:खा खेरीज इतर सामान्यांच्या जीवनांत येणारी दु:खे त्याच्या ग्रंथात त्याने चित्रित केलेली नसली तरीही जीवनाचा खरा अर्थ समजलेल्या त्याच्या पात्रांना कोणतेही दु:ख सोसणे अशक्य नसावे असे वाटते. शेवटी कोणत्यांही कवीचे वा लेखकाचे लेखन सर्वांगपरिपूर्ण नसते , त्यांत कांही ना कांही उणीव असतेच, त्याप्रमाणे कालिदासाच्या ग्रंथातही मर्यादित जीवनाचे दर्शन घडत असले तरी त्याच्या व्यापक मनोवृत्तीचे व मानवी मनाच्या, जीवनाच्या सूक्ष्म व सखोल अभ्यासाचे प्रतिबिंब त्याच्या सर्व ग्रंथात पडलेले आहे असे दिसते.

कालिदासाने काढलेले दैवाबद्दलचे उद्गार व त्यातून प्रकट झालेली मानवाची असहाय्यता यांचे त्याच्या ग्रंथातून होणारे दर्शन हे त्याच्या "तत्त्वज्ञ" वृत्तीचेच निदर्शक आहे.

पण कालिदासाने दैवाबद्दल जे कांही उद्गार काढले आहेत त्या उद्गारावरून तो दैववादी होता हे निश्चित. पण त्याचबरोबर त्याने

या दैवाची कर्मवादाशी सांगड घातली आहे हे विसरता कामा नये. या दोघांची एकमेकांपासून फारकत केल्यास नुसते दैव म्हणजे दुबळेपणा असा त्याचा अर्थ होईल. प्रयत्न, पराक्रम, पुरुषार्थ, निष्ठा, कष्ट, सचोटी, सज्जनपणा या गुणांना मानवी जीवनांत कांही अर्थच राहणार नाही. जन्मत:च जर प्रत्येक व्यक्तीचे भवितव्य निश्चित असेल तर मग प्रयत्न हवाच कशाला ? दैवात असेल तेच होईल, असे म्हणून प्रत्येक व्यक्ती स्वस्थ बसेल. संपूर्ण मानवी जीवन ठप्प होऊन जाईल. मानवाच्या आळशीपणाला दिलेले ते एक प्रोत्साहनच ठरेल. मानवी विकास खुंटेल. त्यामुळे दैवाची कर्मवादाशी फारकत कोणीही करू नये असेच कालिदासाने आपल्या दैवाबद्दलच्या सर्व विचारांत नमूद केले आहे.

"ममैव जन्मान्तरपातकानां विपाकविस्फूर्जथुरप्रसह्य: । रघु. १४/६२

"माझ्या पूर्वजन्मीच्या पातकांचा हा वज्राघाततुल्य परिणाम आहे" असे रामाने त्यागिलेली सीता म्हणते, तर,

नूनं मे सुचरितप्रतिबन्धकं पुराकृतं तेषु दिवसेषु
परिणामाभिमुखमासीद्येन सानुक्रोशोऽप्यार्यपुत्रो मयि विरस: संवृत्त: ।
अभि. शा. ७

पूर्वजन्मीच्या पापामुळेच मी आपल्याला दुरावले असे शकुन्तला म्हणते. याचा अर्थच असा की, "दैव" ही कोणी त्रयस्थ शक्ती अचानक "दत्त" म्हणून येते आणि मानवी आयुष्यांत ढवळाढवळ करून जाते असे नाही, तर हे दैव आपणच आपल्या हातांनी घडवलेले असते. ही जर त्रयस्थ अशी अज्ञात शक्ती असती व तिच्या हातातच मानवी अथवा अमानवी जीवनाच्या दोऱ्या असत्या तर कार्तिकेयाच्या अधिपत्याखाली येऊन सर्व देव दानवांशी लढले नसते, रघुने दिग्विजय केला नसता, रामाने वनवास पत्करला नसता, ऋषीमुनींनी तपश्चर्या केली नसती, पण या सर्वांच्या या कृती हेच सिध्द करतात की "दैव हे मानवाच्या दुबळेपणाचे प्रतीक" आहे. नुसते दैवावर अवलंबून राहिल्यास दैव माणसाकडे पाठच फिरवते. या दैवाला आपण आपल्या

प्रयत्नांनी घेऊन आपले पाहिजे. म्हणूनच कालिदास म्हणतो की,

अनिर्वेदप्राप्याणि श्रेयांसि । - पुरूरवा विक्रमो. ४

म्हणजे "निराश होऊन भाग्याचा लाभ होत नसतो". "अपयश हीच यशाची पहिली पायरी समजून माणसाने सतत प्रयत्नशील असावे" असेच कालिदासाला येथे सांगावयाचे आहे. "दैव" ही मानवी मनाने शोधलेली एक कल्पना आहे, मानवाच्या दु:खी मनाला तो एक दिलासा आहे. सर्व प्रयत्न करूनही जेव्हा अपयश पदरी येते तेव्हा जिज्ञासू मन त्याचे उत्तर शोधू लागते. व हे उत्तर जेव्हां त्याला सापडत नाही तेव्हां ते नशिबाला दोष देऊन रिकामे होते. यामुळे त्याच्या मनाला शांति प्राप्त होते, असेच कालिदासाच्या या सर्व दैवविषयक विचारांचे सार आहे. कालिदासीय सर्व पात्रे "दैव" मानतात, पण प्रयत्नांची पराकाष्ठा झाल्यावरच, त्यांच्या आयुष्यांत "दैवाला" स्थान आहे, पण तेही मानवी गुणानंतरच, आणि हे दैवही ते त्रयस्थ शक्ती मानत नाहीत तर कर्मवादाशी त्याचा सांधा जुळवून ते त्याला आपल्याच सत्कर्मांचे वा दुष्कर्मांचे फळ मानतात. म्हणजे मानवी आयुष्यात किंमत आहे ती आपल्या कर्माला. म्हणून त्याने सतत सत्कर्मरत राहावे. म्हणूनच तो आपल्या "अभिज्ञान शाकुन्तलां"त म्हणतो,

प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिव: ,<br>
    सरस्वती श्रुतमहतां महीयताम् ।<br>
ममापि च क्षपयतु नीललोहित:<br>
    पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभू: ।। अभि. शा. ७/३५